महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.०९/**२६१६७** दिनांक: **२५.१०.२०२१**

**ई-मेल द्वारे**

**प्रति,**
**मुख्य अभियंता,**
**म.रा.वि.वि.कं.मर्या.**
**सर्व परिमंडळ.**

**विषय : शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्त झालेल्या दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना महाराष्ट्र शासन आणि कंपनी नियमाप्रमाणे सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे उपलब्ध करुन देण्याच्या कार्यपध्दती बाबत.**

**संदर्भ :** अकोला परिमंडळ कार्यालय यांचे पत्र क्र. जा.क्र.मुअ/अप/अकोला/मासं/क्र. ००९७२ दि. ३१.०८.२०२१

उपरोक्त संदर्भीत विषयांस अनुसरून महावितरण कंपनी मधील दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांना महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाच्या धर्तीवर सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे उपलब्ध करुन देण्याकरीता प्रशासकीय परिपत्रक क्र ३९३ दि. २८.०२.२०१२ व प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३० दि. १०.०८.२०२१ अन्वये तरतुद करण्यात आलेली आहे. दिव्यांगजन कर्मचाऱ्यांकरीता सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे खरेदी करण्याकरीता रु. ५०,०००/- वरून रु. १,००,०००/- मर्यादे पर्यंत वाढ करण्यात आलेली आहे. उपरोक्त संदर्भीत विषयांच्या अनुषंगाने सदरहु रक्कम मंजुर करताना क्षेत्रीय कार्यालयास अडचणी तथा संभ्रम निर्माण होत असल्याचे सांघिक कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे

२. महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर प्रशासकीय परिपत्रक क्र. ६३० दि. १०.०८.२०२१ अन्वये दिव्यांगजनांस वाहन खरेदी करीता जास्तीत जास्त रु. १,००,०००/- ची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु महाराष्ट्र शासनाच्या निर्णयामधील मंजुर रक्कम ही वाहनाची मुळ किंमतीत वाहन विमा आणि वाहन नोंदणी कर धरून करावी किंवा कसे ? याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नाही. सदर बाबतीत सामाजिक न्याय व कल्याण, विभाग मंत्रालय, मुंबई या कार्यालयातील अधिकाऱ्याशी चर्चेअंती व त्यांनी केलेल्या मार्गदर्शना नुसार सहाय्यक तंत्रज्ञान / उपकरणे उपलब्ध करुन देताना खालील सुचनांचा अवलंब करण्यात यावा.

क. दिव्यांगजन अधिकारी व कर्मचारी यांना वाहन खरेदी करीता जास्तीत जास्त रुपये रु. १,००,०००/- (रु. एक लाख) मर्यादे पर्यंत मंजुर करताना वाहनाची मुळ किंमत (Ex-showroom), अवलंब (Adoption) अधिक वाहन विमा (Insurance) व नोंदणी कर (Registration) या सर्वाची रक्कम ही **रु. १,००,०००/- (रु. एक लाख)** पेक्षा अधिक असता कामा नये. तसेच ठरवुन दिलेल्या मर्यादे पुढील रक्कम ही लाभ धारकाने स्वत: भरावयाची आहे.

ख.	तसेच शासन निर्णयात उल्लेख केल्याप्रमाणे उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१.०१२.२०१६ नुसार वित्त विभागाने विहीत केलेल्या खरेदी पध्दतीचा अवलंब करावा. म्हणजेच दिव्यांगजन अधिकारी व कर्मचारी यांचे वाहनाचे / उपकरणांचे दर पत्रक हे **GEMS** प्रणाली द्वारे कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदर उपकरणे ही **BIS** प्रमाणीत असावीत.

३.	सबब, आपणासं निर्देश देण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील दिव्यांगजन अधिकारी व कर्मचारी यांचे बाबत उपरोक्त मुद्दा क्र. ०२ मधील सुचानांचे अवलोकन व तपासणी करून सदरची प्रकरणे निकाली काढण्यात यावीत.

(अ. [illegible])
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादरः-**
सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद / कोकण (कल्याण).

**प्रत सस्नेह सादरः-**
प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे/नागपूर.

**प्रत रवानाः-**
१) मुख्य महाव्यवस्थापक (मासं) / (तां.आ.) म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्र.व.सु.) म.रा.वि.वि.कं.मर्या. एकलहरे नाशिक.
३) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई-५१.